ePaper

**काँग्रेसची सर्वात मोठी कारवाई, 7 नेत्यांची पक्षातून हकालपट्टी**

| वर्ष - 9 | अंक -92 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 25 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- इटलीची डेव्हिस चषक विजेतेपदाची हॅट्रिक
- माझं १० लिटर रक्त घटल्यासारखं वाटतंय
- प्रदूषण आंदोलनाला राजकीय वळण
- बॉलीवूडचा ही-मॅन काळाच्या पडद्याआड!


**भाजपचा मास्टरस्ट्रोक: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 40% तिकीट तरुणांना**

# राज्यात भाकरी फिरणार!

## फडणवीसांच्या घोषणेनंतर राजकीय समीकरणांमध्ये खळबळ

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा माहोल चांगलाच तापू लागला आहे. नगर परिषद, नगर पंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, तसेच महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय वातावरणात उत्सुकता आणि तणाव वाढला आहे. प्रचाराची रणधुमाळी, आरोप-प्रत्यारोपांची फैरी आणि नवीन समीकरणांमुळे या निवडणुका रंगतदार होण्याची दाट शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपकडून एक मोठा आणि धडाकेबाज निर्णय घेण्यात आला असून त्याने राज्यातील निवडणूक समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील एका कार्यक्रमादरम्यान राज्यातील तरुणांसाठी मोठी घोषणा केली. या निर्णयामुळे जुन्या आणि अनुभवी नेत्यांची तिकिटे धोक्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात तीव्र झाली आहे.

**नेमकं काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

राज्यात होणाऱ्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपकडून मोठ्या प्रमाणावर तरुण नेत्यांना संधी दिली जाणार आहे. या निर्णयाचं कारण स्पष्ट करताना फडणवीस म्हणाले. “महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा प्रवास तरुणांच्या खांद्यावरूनच होणार आहे. त्यामुळे आम्ही 40 टक्के जागा या 35 वर्षांखालील तरुणांना देणार आहोत.” या वक्तव्याने भाजपने युवा मतदारांवर थेट फोकस केल्याचे स्पष्ट झाले आहे.

**अनुभवी नेत्यांना धक्का?**

भाजपच्या या निर्णयामुळे अनेकांना धक्का बसण्याची शक्यता आहे. कारण गेल्या दोन कार्यकाळात सातत्याने सक्रिय असलेल्या नगरसेवक आणि पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची तिकिटे कापली जाण्याची भीती व्यक्त होत आहे. यात केवळ नगर परिषद किंवा नगर पंचायत नाही तर महानगरपालिका ते जिल्हा परिषद या सर्व निवडणुकांचा समावेश असेल.

- **भाजपचा मोठा निर्णय — स्थानिक स्वराज्य निवडणुकीत 40% तिकीट तरुणांना!**
- **फडणवीसांची घोषणा — “युवा शक्तीच महाराष्ट्राचं भविष्य”**
- **पक्षातील अनेक अनुभवी नेत्यांची तिकीटं धोक्यात?**
- **राष्ट्रवादी शरद पवार गटानंतर भाजपची युवा कार्ड खेळी!**

**इतर पक्षांचेही समान पाऊल!**

तरुणांना महत्व देण्याची ही स्पर्धा फक्त भाजपपुरती मर्यादित नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांनीही अशाच प्रकारचा निर्णय मागील आठवड्यात घेतला होता. शरद पवार यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना स्पष्ट निर्देश दिले होते. “स्थानिक स्तरावरून तरुणांना पुढे आणा आणि नवीन नेतृत्व तयार करा.” या पार्श्वभूमीवर आता दोन्ही गटांनी घेतलेल्या निर्णयांमुळे निवडणूक रंगतदार होणार यात शंका नाही.

**राजकीय विश्लेषकांचे मत**

राजकीय जाणकारांचे मत आहे की, राज्यातील युवकांची संख्या 18–35 वयोगटात मोठी आहे. युवा मतदारांना आकर्षित करण्यासाठी हा घोषणेचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे. या निर्णयामुळे नवीन उर्जा पक्षात येईल. तथापि काही विश्लेषकांचे मत आहे की, “अनुभवी नेतृत्व बाजूला केल्यास तळागाळातील संघटनात्मक क्षमता कमकुवत होण्याचा धोका आहे.”

**निवडणूक चित्र आणि पुढची समीकरणे**

एका बाजूला महायुती आणि दुसरीकडे महाविकास आघाडी यांच्यात चुरशीची लढत अपेक्षित आहे. यामध्ये तरुणांच्या सहभागामुळे राजकारणात नव्या पिढीचा चेहरा पुढे येणार असून राज्याची निवडणूक ‘युवा विरुद्ध अनुभव’ अशी होण्याची शक्यता आहे.भाजपचा हा निर्णय पुढील दशकासाठीची राजकीय गुंतवणूक असल्याचे मत राजकीय वर्तुळात व्यक्त केले जात आहे. या निर्णयामुळे भाजपने ‘नव्या महाराष्ट्राचा’ संदेश दिला असून येणाऱ्या आठवड्यांत या घोषणेमुळे राजकीय समीकरणे किती बदलतात हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## राज्यातील राजकारणात ‘अनुभव विरुद्ध युवा’ अशी नवी लढत रंगण्याची चिन्हे

महाराष्ट्रातील युवा शक्तीवर विश्वास व्यक्त करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील तरुणांशी संवाद साधताना महत्त्वपूर्ण घोषणा केली. फडणवीस यांनी स्पष्ट केलं की, येणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपकडून किमान ४० टक्के जागा या ३५ वर्षांखालील तरुणांना देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे भाजपने निवडणुकीत ‘युवा कार्ड’ खेळत आगामी राजकीय पिढीला पुढे आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तरुणांना अधिक संधी देत पक्षाचे नेतृत्व नव्याने तयार करण्याच्या दृष्टीने ही घोषणा महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान, या धोरणामुळे आतापर्यंत पक्षात सक्रीय असलेल्या अनेक विद्यमान नगरसेवक व नेत्यांची तिकिटे कापली जाऊ शकतात, अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. विशेषत: महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये या निर्णयाचा थेट परिणाम होणार आहे. तसेच, इतर राजकीय पक्षांनाही आता अशाच प्रकारचा निर्णय घेण्याचा दबाव येण्याची शक्यता आहे. कारण तरुण मतदारांची संख्या मोठी असल्याने त्यांच्यावर प्रभाव टाकणे ही राजकीय रणनीतीतील मोठी किल्ली ठरू शकते.भाजपच्या या निर्णयामुळे राज्यातील राजकारणात ‘अनुभव विरुद्ध युवा’ अशी नवी लढत रंगण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.

वाढते अपघात रोखण्यासाठी

‘जीपीएस’ यंत्रणा, ‘सीसीटीव्ही’ कॅमेरे

# हिंजवडीत वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित

## रात्री नऊ वाजेपर्यंत बंदी केली

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्क परिसरातील वाढते अपघात रोखण्यासाठी पोलिसांनी पाऊले उचलली आहेत. जड, अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा ३० किलोमीटर प्रतितास करण्यात येणार आहे. हिंजवडी आणि परिसरातील सर्व जड वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवली जाणार आहे. स्पीड गनद्वारे वेगमर्यादा पालन होते किंवा कसे याची शहानिशा करण्यात येणार आहे.**



हिंजवडीसह वाकड, रावेत, पुनावळे, ताथवडे परिसरात मोठमोठे गृहप्रकल्प उभारले जात आहेत. बांधकामासाठी लागणारा कच्चा माल पुरविणाऱ्या रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्पांची संख्याही अधिक आहे. बांधकाम साहित्याची वाहतूक करणाऱ्या जड, अवजड वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मागील ११ महिन्यांत हिंजवडी, वाकड परिसरात अपघातामध्ये ३७ जणांचा मृत्यू झाला आहे. अवजड वाहनांना सकाळी आठ ते बारा आणि दुपारी चार ते रात्री नऊ वाजेपर्यंत बंदी केली आहे. तरीही जड, अवजड वाहने शहरात प्रवेश करीत आहेत. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पोलीस आयुक्तालयामध्ये जड, अवजड वाहन व त्यामुळे होणारे अपघात यांना प्रतिबंध करण्यासाठी उपाय योजना संदर्भात बैठक झाली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पीएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, वाहतूक विभागाचे उपायुक्त विवेक पाटील, परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, पिंपरी- चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) संदेश चव्हाण, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यावेळी उपस्थित होते. बेकायदेशीरपद्धतीने चालणाऱ्या रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्प चालकांना पीएमआरडीएमार्फत काम थांबवण्यासाठी नोटीस देण्यात येणार आहे. अनधिकृतपणे कार्यरत असलेल्या आरएमसी प्रकल्पावर निष्कासनाची कारवाई करण्यात येईल. जड, अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा ३० किलोमीटर प्रतितास करण्यात येणार आहे. हिंजवडी आणि परिसरातील सर्व जड वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवली जाणार आहे. यामुळे वाहनांचे नेमके स्थान, वेग, ब्रेकिंग दाबण्याची पद्धती आणि वाहन चालविण्याची पद्धती याची माहिती प्रत्यक्ष स्वरूपात मिळेल. जड, अवजड वाहनांची सुरक्षा तपासणी केली जाणार आहे.

### ११ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाला

कंपनीसमोर सायंकाळी घडली. मिक्सरने धडक दिल्याने प्रत्युषा बोराटे या ११ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाला. १० ऑक्टोबर रोजी माण रस्त्यावरील पांडवनगर येथे भरधाव सिमेंट मिक्सर वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील भारती राजेश मिश्रा (वय ३०, रा. थेरगाव) या महिलेचा मृत्यु झाला. १७ नोव्हेंबर रोजी वडिलांसोबत दुचाकीवरून जात असताना डंपरची धडक बसून झालेल्या अपघातात तन्वी सिद्धेश्वर साखरे (वय २०) हिचा मृत्यू झाला.

वाहन चालकांचा परवाना तपासणी तसेच वाहन चालकांना वाहतुकीच्या नियमाबाबत जागरूकता व वाहतूक नियमांचे पालन यासाठी आरटीओ, वाहतूक विभाग आणि स्थानिक पोलिसांचे पथक संयुक्तरीत्या आरएमसी प्रकल्प असलेल्या ठिकाणीच प्रशिक्षण देणार आहेत. जड वाहनांच्या चालकांना ते चालविण्याचे योग्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. डंपर, हायवा, मिक्सर या वाहनांच्या मागील चाकाखाली येऊन अपघात होत आहेत. त्यामुळे या वाहन चालकासोबत सहचालक, मदतनीस (क्लीनर) ठेवणे, बाजूनेचाक कव्हर करण्यासाठी बंपर, सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी आरटीओ विभागामार्फत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी चव्हाण यांनी सांगितले. जड, अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा ३० किलोमीटर प्रतितास करण्यात येणार आहे. हिंजवडी आणि परिसरातील सर्व जड वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवली जाणार असल्याचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितले. हिंजवडी परिसरात सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी अवजड वाहनांना बंदी आहे. मात्र, या बंदी आदेशाचे उल्लंघन करून अवजड वाहने सर्रासपणे प्रवेश करतात. या अवजड वाहनांनी गेल्या दहा महिन्यात पाच महिलांचा बळी घेतला. २४ जानेवारी रोजी हिंजवडी – माण रस्त्यावरील वडजाईनगर कॉर्नरजवळ भरधाव जाणारा रेडिमिक्स डंपर वळण घेताना अचानक पलटी झाला.

# आरक्षण पन्नास टक्क्यांच्या पुढे गेले का?

## निवडणूक पुढे जाणार का? अधिकाऱ्यांनी केले स्पष्ट...

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने सोडतीमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली नाही. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त नसल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक होण्यास कोणताही अडथळा नसल्याचे महापालिका निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यासाठी दिलेल्या कालावधीत ७२ तक्रारी महापालिकेकडे सादर झाल्या आहेत.**



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही. याची दक्षता घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासन, राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. मात्र, राज्यात काही जिल्हा परिषदा, महापालिकांनी ही मर्यादा ओलांडल्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावर मंगळवारी सुनावणी होणार आहे. ज्या ठिकाणी ही मर्यादा ओलांडली आहे, त्या ठिकाणी निवडणुकीला अडथळे येण्याची शक्यता आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा विचार करता या ठिकाणची

### असे आहे आरक्षण!

एससीसाठी १५.६२ व एसटी जागांसाठी २.३४ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. हे आरक्षण ५० टक्के मर्यादेच्या आत असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत कोणताही अडथळा नाही, अशी प्रतिक्रिया पालिका अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या राखीव जागांमधील आणि खुल्या प्रवर्गातील निम्म्या जागा महिलांसाठी राखीव असतात. महापालिकेने ११ नोव्हेंबर रोजी आरक्षणाची सोडत काढली. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार प्रभाग १९ मधील ‘ब’ व ‘क’ आणि ३० मधील ‘क’ आणि ‘ड’ जागेच्या आरक्षणात बदल करण्यात आला.

आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आतच आहे. महापालिकेमध्ये नगरसेवकांची संख्या १२८ आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या (एससी) २० जागा, अनुसूचित जमातीच्या (एसटी) तीन जागा आणि नागरिकांचा इतर मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) ३४ जागा देण्यात आल्या आहेत. त्यानुसार आरक्षणाची ही मर्यादा ४४.५२ टक्के होते. त्यामध्ये एकूण नगरसेवकांच्या आकडेवारीनुसार ओबीसीसाठी २६.५६ टक्के आरक्षण आहे.

जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान | पिंपरी चिंचवडच्या

# निवडणुकीत नेत्यांच्या नातेवाईकांनाच उमेदवारी!

## भाजप आमदार, माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांची पत्नी, मुला-मुलींच्या तिकीटासाठी 'फिल्डिंग'

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना आणि काँग्रेसवर घराणेशाहीचा आरोप करीत टीकेची झोड उठवणाऱ्या भारतीय जनता पक्षालाच आता घराणेशाहीची लागण झाल्याचे चर्चा पिंपरी-चिंचवड शहरात जोर धरत आहे. भाजपमध्ये घराणेशाहीला स्थान नाही असा दावा वरिष्ठ नेते नेहमी करीत असले तरी स्थानिक राजकारणात मात्र चित्र नेमके उलटे दिसत आहे.**



येथील आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार, माजी नगरसेवक आणि पदाधिकारीही आपल्या पत्नी, मुला-मुलींना राजकारणाच्या रिंगणात उतरवण्यासाठी जोरदार प्रयत्न करत असल्याचे समोर आले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे यांचे चिरंजीव जयदीप खापरे हे चिंचवडमधील प्रभाग क्रमांक १९ मधून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. सध्या त्यांच्यावर विधानसभा मंडलाध्यक्ष पदाची जबाबदारी आहे. तसेच तो प्रभाग आपला पूर्वीचा बालेकिल्ला असल्याचे आमदार उमा खापरे यांनी सांगत आहे.

खापरे यांनी आपल्या मुलाला प्राधिकरण प्रभागातून उमेदवारी मिळावी यासाठीही सुरूवातीला प्रयत्न केले होते. मात्र आत्ता प्रभाग १९ अनुकूल असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मतदारांचे लक्ष वेधण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजनही केले आहे. याचबरोबर भाजपचे शहरातील ज्येष्ठ नेते शरद (भाई) सोनावणे यांच्या सुनेने यापूर्वीच सांगवी परिसरातून निवडणूक लढविली आहे. तर माजी नगरसेवक राजू दुर्गे यांच्या मुलीनेही आकुर्डी प्रभागातून निवडणूक लढविली आहे. या दोघी पुन्हा निवडणूक लढविण्यासाठी तयारी करत आहेत. तर दुसरीकडे शहरातील प्राधिकरणाचे अध्यक्ष राहिलेले सदाशिव खाडे यांनी आपल्या पत्नी संगिता खाडे यांना प्रभान क्रमांक २० मधून उमेदवार मागितली आहे.

जर प्रभाग ओबीसी पुरूष झाल असता तर आपल्या मुलाने निवडणूक लढविली असती असेही खाडे म्हणाले.

शहरातील भाजपचे आमदार महेश लांडगे यांच्या बंधूनेही भोसरीमधून महापालिकेची निवडणूक लढविली आहे. यावेळी देखील ते निवडणुकीची तयारी करत आहेत.

आमदार शंकर जगताप यांचे निकटवर्ती माऊली जगताप तिकटीसाठी आग्रही आहेत. विशेष म्हणजे, सर्व नेते भाजपचे जुने व निष्ठावान कार्यकर्ते आहेत. त्यामुळ पक्षात नव्या कार्यकर्त्यांना संध् मिळेल का की सर्व उमेदवार १घराणेवाल्यांच्या शिक्कामोर्तब होईल, असा प्रश्न उभा राहिला आहे.

### कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर

स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. भाजपमध्ये घराणेशाही नाही, मेहनत करणाऱ्यांनाच संधी मिळते असे सांगणारेच आता आपल्या कुटुंबातील सदस्यांना पुढे आणताना दिसत आहेत. त्यामुळे पक्षातील तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये अन्याय झाल्याची भावना वाढत आहे. अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भागातील जनतेसाठी काम करूनही त्यांच्या जागा आता घराणेशाहीच्या राजकारणात बळी पडत असल्याची खंत व्यक्त केली आहे. दरम्यान, नागरिकांमध्येही या घडामोडींवरून चर्चा रंगू लागली आहे. आमच्या पक्षात फक्त लोकशाही चालते. घराणेशाही ही इतर पक्षांची देणगी आहे अशी टीका करणाऱ्या भाजपने आता त्याच वाटेवर पाऊल टाकल्याने पक्षाची भूमिका कितपत सुसंगत आहे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. आगामी महापालिका निवडणुकीत या घराणेशाहीच्या छायेत कोणाचे तारे उजळतात आणि कार्यकर्त्यांचा विश्वास कोण टिकवतो, हे पाहणे आता राजकीय वर्तुळात उत्सुकतेचे ठरले आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये साकारतेय टाकाऊतून नवनिर्मिती

## आरोग्य विभाग स्वच्छतेतून जपतोय परिसराची सुंदरता

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड शहरात स्वच्छता आणि सौंदर्यनिर्मिती यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळत आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाने 'टाकाऊ वस्तूंपासून सर्जनशीलता' या संकल्पनेला नवचैतन्य देत, शहरातील टाकाऊ वस्तूंमधून आकर्षक कलाकृती निर्मितीचा उपक्रम मोठ्या उत्साहात राबवला आहे. या कलाकृती केवळ नजरेत भरणाऱ्या नसून पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता उपक्रमास देखील चालना देणाऱ्या ठरत आहेत.**




शहरातील विविध कचरा संवेदनशील ठिकाणी हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला आहे. यामध्ये ब क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग १७ बिजलीनगर, प्रभाग २२ शांती चौक काळेवाडी तसेच , इ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग ०५ सखुबाई गवळी उद्यान, आळंदी रोड, भोसरी येथे असलेली संवेदनशील ठिकाणे आता रंगतदार, देखण्या कलाकृतींनी सुशोभित झाली आहेत.

> पिंपरी चिंचवड महापालिकेची ही कलात्मक मोहीम इतर शहरांसाठीही प्रेरणादायी ठरत असून पुढील काळात अशाच अनेक सुशोभीकरण प्रकल्पांचे नियोजन सुरू आहे. टाकाऊ वस्तूंच्या कल्पक वापरातून पिंपरी चिंचवड शहर स्वच्छता आणि सौंदर्याचा नवा आदर्श निर्माण करत आहे.
>
> —**डॉ. प्रदीप ठेंगल,** उप आयुक्त, आरोग्य विभाग
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सफाई सेवकांनी केवळ स्वच्छता न करता, टाकाऊ टायर, प्लास्टिकचे डबे, बाटल्या, लोखंडी फ्रेम्स, पाइप्स यांसारख्या वस्तूंचा कल्पकतेने उपयोग करून उद्याने, रस्त्याकडील जागा आणि सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण केले. त्यांच्या कल्पकता आणि मेहनतीमुळे शहरात सौंदर्याची नवी उधळण झाली आहे.

या उपक्रमासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य विभाग प्रमुख व उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य कार्यकारी अधिकारी व सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आरोग्य अधिकारी राजेश भाट, सुधीर वाघमारे, श्रीराम गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक अतुल सोनवणे, भूषण शिंदे, आरोग्य निरीक्षक रूपाली साळवे, मुकेश जगताप आणि विकास शिरवाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर केल्यास सुंदर परिवर्तन घडवता येते हे आरोग्य विभागाने आपल्या कृतीतून सहज दाखवून दिले आहे. या मोहिमेला नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांच्या अशा सहभागामुळे शहरात 'स्वच्छतेतून सौंदर्य' असा सकारात्मक बदल दिसून येत आहे.

# ब्राझीलचा 'उठावखोर' गोत्यात!




**लोकशाही पद्धतीने निवडून आल्यानंतर निरंकुश सत्ता उपभोगायची आणि लोकशाही मार्गानेच पराभव झाल्यानंतर मात्र, या व्यवस्थेची प्रतीके उद्ध्वस्त करण्यास निघायचे, असे आधुनिक 'टूलकिट' गेल्या काही वर्षांमध्ये दोन नेत्यांनी ठळकपणे आचरले. यांतील एक आहेत अमेरिकेचे माजी आणि इच्छुक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प. दुसरे आहेत ब्राझीलचे माजी, पराभूत अध्यक्ष जाइर बोल्सोनारो.**



या दोघांच्या कृत्यामध्ये एक मूलभूत फरक मात्र आहे. ट्रम्प यांनी निवडणूक निकाल जाहीर होऊ लागताच आकांडतांडव केले. निकालांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या पावित्र्याविषयी शंका उपस्थित करण्यास सुरुवात केली आणि पराभव सुनिश्चित झाल्यानंतर अमेरिकी कायदेमंडळाच्या इमारतीवर आपल्या समर्थकांना चाल करून जाण्यास चिथावले. ब्राझीलची अध्यक्षीय निवडणूक त्या घटनेनंतर (६ जानेवारी २०२१) जवळपास वर्षभराने झाली. त्या निवडणुकीत पराभव होणार याची आधीच चाहूल लागल्यामुळे, ही निवडणूकच मोठा घोटाळा असल्याची बोगस माहिती बोल्सोनारो समर्थकांमार्फत पसरवली गेली. जेणेकरून त्या एका कारणास्तव निवडणूक प्रक्रियेतील लष्करी हस्तक्षेप समर्थनीय ठरावा. या प्रयत्नांमध्ये काही लष्करी अधिकारी, पोलीस अधिकारी, गुन्हेगारी टोळ्या सहभागी असल्याचा निष्कर्ष ब्राझीलच्या पोलिसांनी काढला. या पोलिसांना तपासाचा सर्वाधिकार ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाकडून बहाल झाला आहे. यासंदर्भात गेल्या आठवड्याभरात विविध ठिकाणी छापासत्र झाले, काही जणांना अटक करण्यात आली. उठाव करून ब्राझीलमधील लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्याचा कट होता. अशा अस्थिर वातावरणात त्यावेळी अध्यक्ष असलेले बोल्सोनारो यांचा प्रदीर्घकाळ सत्तेवर राहण्याचा मार्ग मोकळा होणार होता.ऑक्टोबर २०२२मध्ये झालेली निवडणूक बोल्सोनारो हरले. ही निवडणूक प्रदीर्घ काळ लांबली आणि अंतिम निवडीसाठी फेरनिवडणुकीचा मार्ग अवलंबावा लागला होता. पण पराभव झाल्यानंतर काही दिवसांनी, विशेषतः ८ जानेवारी २०२३ रोजी राजधानी ब्रासिलिया शहरात बोल्सोनारो समर्थकांनी धुडगूस घातला. त्यांना लष्कराकडून अपेक्षित समर्थन मिळाले नाही.तरीदेखील अध्यक्षीय प्रासाद, कायदेमंडळाची इमारत, सर्वोच्च न्यायालयाची इमारत अशा महत्त्वाच्या ठिकाणांवर हे समर्थक चाल करून गेले. बोल्सोनारो या उठावखोरीमध्ये सकृद्दर्शनी दोषी आढळले आहेत. गुन्हा सिद्ध झाल्यास त्यांना २९ वर्षांचा कारावास होऊ शकतो. आपण निर्दोष असल्याचे आणि आपला छळ सुरू असल्याचे ते आजही सांगतात. मात्र पोलीस तपासास साह्य करण्याची भूमिका त्यांनी घेतली असून, पारपत्रही पोलिसांच्या हवाली केले आहे. गतवर्षी ब्राझीलियन काँग्रेसच्या एका समितीने त्यांना उठावखोरीप्रकरणी दोषी ठरवले. तत्पूर्वी एका न्यायालयाने याच कारणास्तव त्यांच्यावर २०३०पर्यंत कोणतीही निवडणूक लढवण्यावर बंदी आणली. बोल्सोनारो यांचे आदर्श डोनाल्ड ट्रम्प! गतवर्षी निवडणूक हरल्यानंतर ते अमेरिकेतच ट्रम्प यांचा पाहुणचार घेण्यासाठी गेले होते. रीतसर झालेल्या निवडणुकीच्या सत्यतेविषयी चुकीची माहिती पसरवायची, समर्थकांना चिथावून रस्त्यावर आणायचे आणि लोकशाहीच्या प्रतीकांवर चाल करून जायची हा धक्कादायक प्रकार अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच ६ जानेवारी २०२१ रोजी घडला होता. असे उठाव आणि जानेवारी महिना हे ट्रम्प यांच्याप्रमाणेच बोल्सोनारो यांनाही आदर्शवत वाटले असावेत. पण अमेरिकेइतकी ब्राझीलची न्याय व तपास यंत्रणा गोंधळलेली दिसत नाही.अमेरिकेमध्ये तर विविध न्यायालयांमध्ये ट्रम्प यांच्याविरुद्ध उठावखोरीचा खटला दाखल करण्यावरच एकमत होत नाही. त्यांनी अशी कृती केली- म्हणजे चिथावणी दिली त्यावेळी ते अध्यक्ष होते. अशा व्यक्तीस काही स्वरूपाच्या गुन्ह्यांपासून पदसिद्ध संरक्षण मिळते किंवा कसे यावरच तेथे अजून खल सुरू आहे. तशात अमेरिकी अध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून ट्रम्पच उतरवले जातील.

## असे कसे?

### पक्षी झोप कशी काढतात?

***पक्षी घरटी बांधतात हे खरं; पण त्या घरट्यांचा वापर विणीच्या हंगामात अंडी घालण्यासाठी केला जातो.***

ती अंडी फुटून त्यातून पिल्लं बाहेर आली की त्यांच्या पंखांमध्ये स्वतंत्रपणे उडून जाण्याइतकं बळ येण्यापूर्वी तीही त्या घरट्यांमध्ये राहत असतात. त्यांना त्यांचं अन्न भरवण्यासाठी त्यांचे आई-वडील घरट्यात येत असतील तेवढेच. एरवी ते तिथं येऊन राहतात असं नाही. त्यांचे सारे व्यवहार झाडाच्या फांदीवरच होतात. ते झोपही तिथंच काढतात. काही वेळा विजेच्या किंवा असल्याच दुसऱ्या तारांवरही ते बसलेले आढळतात. साहजिकच, झोपेत ते तिथून पडत कसे नाहीत? असा प्रश्न मनात येतो. तिथंच बसल्याबसल्या ते झोप कशी काढतात?याचं कारण त्यांच्या पायांच्या स्नायूंच्या रचनेत आढळेल. आपण आपला गुडघा वाकवू शकतो. तो असा मुडपता येत नसता तर आपल्याला चालता, पळता आलंच नसतं. पाय ताठ ठेवून चालायचं म्हणजे कष्टाचं, जिकीरीचं काम झालं असतं. आपण असा गुडघा मुडपू शकतो कारण गुडघ्याच्या हाडांना जोडलेल्या स्नायूंच्या शिरा आकसतात तसंच त्यांची लांबी वाढूही शकते.

यंदाच्या अर्थसंकल्पात लोकानुनयी घोषणा असतील, ही अपेक्षा खोटी ठरवून देश मजबूत करण्यासाठी सिमेंट, ऊर्जानिर्मिती, कोळसा या उद्योगांना तसेच अन्य नवउद्योगांना मदतगार ठरणारे निर्णय सरकारने घेतले. गरीबांसाठी सौरऊर्जा, घरांसाठी साह्य आणि आरोग्य विम्यासारख्या सुविधांची व्याप्ती वाढवण्याचा विचारही यंदा दिसून आला.

# लोकानुनय नव्हे; देशाची उभारणी!

दशकभरापूर्वी वित्तभांडवलाच्या जागतिक क्षेत्रात कायकाय कूट-शब्द वापरले जात, हे जरा आठवून पाहा- 'फ्रॅजाइल फाइव्ह' आणि 'पीआयआयजीएस' म्हणजे 'पीग्ज' हे चटकन आठवतील. यापैकी दुसरा शब्द हा मुख्यत: युरोपातल्या कर्जबाजारी देशांसाठी वापरला गेला, पण अतिनाजूक पाचांमध्ये (फ्रॅजाइल फाइव्ह) भारताचाही समावेश त्या वेळी केला जाई. कारण, ज्या अर्थव्यवस्था नुकत्या वाढू लागलेल्या असूनही इतरांवर फार अवलंबून होत्या आणि त्यामुळे बेभरवशी होत्या, त्यात आपणही मोजले जात होतो- हे सारे, द्रष्टे अर्थशास्त्रज्ञ पंतप्रधानपदी असताना आणि त्यांचे अर्थमंत्रीसुद्धा बुद्धिवंत असताना होत होते. या खिन्न अवस्थेतून आणि आर्थिक स्तब्धतेपासून ते 'जगातील एकमेव उज्ज्वल स्थाना'पर्यंतच्या प्रवासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. पुढील काही महिन्यांत आपण सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे



जात असताना, अर्थव्यवस्थेची हाताळणी हा पंतप्रधानांच्या प्रगतीपुस्तकातील सर्वात तेजस्वी तारा आहे. हा आर्थिक संदर्भ आणि त्यातून येणारा राजकीय आत्मविश्वास यंदाच्या लेखानुदानातही (हंगामी अर्थसंकल्पातही) दिसून आला.लोकानुनयी अर्थसंकल्पाचीच अपेक्षा साऱ्यांना असूनसुद्धा, भारताचे दीर्घकालीन फायदे शीर्षस्थानी ठेवण्याच्या आपल्या ध्येयावर सरकार यंदा ठाम राहिले. याला हे देऊ कर, त्या गटाला ते आश्वासन दे, अशा अल्प-मुदतीच्या निवडणूक लाभांच्या दबावाखाली हे लेखानुदान आलेले नाही. याउलट, विकसित भारताचा मार्ग ज्या पायावर भक्कमपणे उभारला जाईल, असा पायाच लेखानुदानाने मजबूत केलेला आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात, शाश्वत आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक संरचनात्मक बदल दिसून आले आहेत. त्यातही विशेष म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. या पायाभूत सुविधा फक्त अभियांत्रिकीपुरत्या नसून सामाजिक आणि डिजिटलही आहेत. ताज्या अर्थसंकल्पातही हे सूत्र कायम राहिले आहे. पायाभूत सुविधांवरील खर्चात आणखी ११.११ टक्क्यांनी वाढ करण्याचा प्रस्ताव आहे, एकंदर पायाभूत सुविधांची तरतूद यामुळे गेल्या चार वर्षांत तिप्पट झालेली आहे! पायाभूत सुविधांमध्येही यंदा रेल्वेवर भर देण्यात आला आहे. बंदरांशी जोडलेली वाहतूक-व्यवस्था, अत्यंत वर्दळीची रहदारी हे लक्षात घेऊन आणि ऊर्जा, खनिजे आणि सिमेंट क्षेत्रांसाठी उभारले जाणारे रेल्वेचे खास कॉरिडॉर मालवाहतुकीचा दर्जा आणि वेग सुधारतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## सरकारने कठोर पावले उचलली

## नगरविकास विभागाचे महापालिकांना आदेश

# कुत्र्यांना खायला घाल तर कारवाई!

## वाढलेल्या संख्येवर नियंत्रण



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भटक्या कुत्र्यांकडून लहान मुले तसेच नागरिकांवर होणारे हल्ले तसेच त्यांची वाढलेली संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलली आहेत. यापुढे भटक्या कुत्र्यांना मोकळ्या जागेत खायला दिल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्याचप्रमाणे अशा कुत्र्यांचे निर्बिजीकरण आणि लसीकरण अनिवार्य करण्यात आले असून सर्वोच्च न्यायालच्या निर्देशांचे पालन न केल्यास त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरले जाणार असून त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे.**

भटक्या कुत्र्यांकडून लहान मुलांवर होणारे हल्ले आणि वाढता उपद्रव याबाबत तिव्र नाराजी नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले होते. या निर्देशांनुसार नगरविकास विभागाने परिपत्रक जारी केले असून महापालिका, नगरपालिका, परिसरात भटक्या कुत्र्यांसंदर्भात कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने सर्व महापालिका/नगरपालिकांना प्रत्येक नगरी भागात कुत्र्यांची नियमित पकड मोहीम, त्यांचे निर्बिजीकरण आणि रेबीज लसीकरण अनिवार्य केले आहे. तसेच ज्या भागात कुत्र्यांचे पुनर्वसन किंवा सोडले जाईल तेथील संपूर्ण नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या खाण्याच्या जागा निश्चित करून त्याच ठिकाणी खायला देण्यात यावे. याची खातरजमा करण्यात यावी तसेच मोकळ्या ठिकाणी खायला देणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करण्याचेही आदेश नगरविकास विभागाने दिले आहेत.महापालिका, नगरपालिका, नगरपंचायतीनी त्यांच्या क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण आणि जंतनिर्मूलन करावे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीची उपचार सुविधा मिळावी यासाठी रुग्णालयांमध्ये अँटी रेबीज लस व इम्युनोग्लोब्युलिन साठा अनिवार्य करण्यात आला असून, सर्व सरकारी रुग्णालयांना पुरेसा साठा ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.ज्या परिसरात कुत्र्यांची संख्या जास्त आहे अशा सार्वजनिक ठिकाणांवर विशेष मोहीम राबवून कुत्र्यांचे नियंत्रण करण्यात यावे. कुत्र्यांचे निर्बीजीकरण लसीकरण केल्यानंतर नियुक्त केलेल्या जागेत हलविण्याची जबाबदारी तसेच त्यांना पुन्हा त्या जागेत सोडले जाणार नाही याची दक्षात घेण्यात यावी. भटक्या श्वानांना पकडून त्यांच्यासाठी आश्रय, निवाऱ्यांची सोय करावी. नागरिकांना भटक्या कुत्र्यांबाबत तक्रार देण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन विकसित करावी. शिवाय नागरिकांकडून तक्रार मिळताच त्वरित कारवाई करावी. सर्व महापालिकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालय उभारावे असेही स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत.

भटक्या कुत्र्यांकडून लहान मुले तसेच नागरिकांवर होणारे हल्ले तसेच त्यांची वाढलेली संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलली आहेत. यापुढे भटक्या कुत्र्यांना मोकळ्या जागेत खायला दिल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्याचप्रमाणे अशा कुत्र्यांचे निर्बिजीकरण आणि लसीकरण अनिवार्य करण्यात आले असून सर्वोच्च न्यायालच्या निर्देशांचे पालन न केल्यास त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरले जाणार असून त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे. भटक्या कुत्र्यांकडून लहान मुलांवर होणारे हल्ले आणि वाढता उपद्रव याबाबत तिव्र नाराजी नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले होते. या निर्देशांनुसार नगरविकास विभागाने परिपत्रक जारी केले असून महापालिका, नगरपालिका, परिसरात भटक्या कुत्र्यांसंदर्भात कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत.

### रेबीज लसीकरण अनिवार्य केले

त्यानुसार राज्य शासनाने सर्व महापालिका/नगरपालिकांना प्रत्येक नगरी भागात कुत्र्यांची नियमित पकड मोहीम, त्यांचे निर्बिजीकरण आणि रेबीज लसीकरण अनिवार्य केले आहे. तसेच ज्या भागात कुत्र्यांचे पुनर्वसन किंवा सोडले जाईल तेथील संपूर्ण नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या खाण्याच्या जागा निश्चित करून त्याच ठिकाणी खायला देण्यात यावे.

# हिंदूंनो किमान दोन मुलं जन्माला घाला

## तरच हिंदू धर्म टिकेल, अन्यथा..” नरेंद्र महाराज यांचे वक्तव्य

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जगात अनेक ख्रिश्चन आणि मुस्लीम राष्ट्र आहेत. तसेच एक हिंदू राष्ट्र असायला नको का? त्यासाठी देशातील हिंदू समुदायाने जास्तीत जास्त अपत्ये जन्माला घातली पाहिजेत, पीठ रामानंदाचार्य नरेंद्र महाराज यांनी केलं. हिंदूंची लोकसंख्या कमी होत राहिली तर भारतातील बहुसंख्य हिंदू संपुष्टात येतील, असे त्यांनी म्हटले. ते सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी हिंदू समाजाला किमान दोन अपत्य जन्माला घालण्याचे आवाहन केलं.**

भारतातील बहुसंख्य हिंदू लवकरच संपणार आहेत. आम्ही दोन आणि आमचं एक, असे हिंदू समाजाचं अपत्यांबाबतचं धोरण आहे. मी हिंदू समाजाला आवाहन करतो की, तुम्ही दोन आणि किमान तुमची दोन मुलं असली पाहिजेत.

तरच हिंदू धर्म टिकेल. तुम्ही एका अपत्याला जन्म देताय, हे चूक आहे. त्यामुळे हिंदूंची लोकसंख्या झपाट्याने कमी होत आहे आणि मुस्लिमांची संख्या वाढत आहे. लोकशाहीत व्होटबँकेच्या राजकारणाला महत्त्व असते. या व्होटबँकेमुळे निवडून आलेल्या व्यक्तीला महत्त्व असते. त्यामुळे भारतामध्ये हिंदूंची संख्या वाढली पाहिजे. हिंदूंनी संघटित झाले पाहिजे. तुम्ही देश,



देव आणि धर्मासाठी काम केले पाहिजे. आमच्यासारखे धर्मगुरु तुम्हाला पाठिंबा देतील, असे नरेंद्र महाराज यांनी म्हटलं आहे.नरेंद्र महाराज म्हणाले, आपली संस्कृती आपल्याला कळली नाही म्हणून आपण पुरोगामींच्या नावाखाली धिंगाणा घालतो. अध्यात्मातील विज्ञान आपल्याला कळालेलं नाही म्हणून आपला धिंगाणा सुरु आहे.

मी याठिकाणी धिंगाणा हा शब्द जाणीवपूर्वक वापरत आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी मनःशांती देऊ शकत नाही, ती शांती अध्यात्मच देऊ शकते. अध्यात्मात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक दृष्टिकोन आहे, हे पुरोगाम्यांना कळत नाही. पुरोगामीत्वाच्या नावाखाली पाश्चिमात्य संस्कृती स्वीकारण्याचं काम सुरू आहे. ती खरी दुर्बुद्धी आहे. जगात भारत हा एकमेव सक्षम देश आहे, जो संस्कृतीच्या माध्यमातून मनःशांती देऊन शकतो, असेही नरेंद्र महाराजांनी म्हटले.नरेंद्र महाराज यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली.

काँग्रेसच्या काळात हिंदू सणांवर टीका व्हायची. आता भाजपाच्या काळात हिंदू धर्माचं संवर्धन होत आहे, असा दावा त्यांनी केला. तसेच धर्मांतरावरही त्यांनी भाष्य केलं. आम्ही १ लाख ५३ हजार लोकांना हिंदू धर्मात घेतलं.

### नरेंद्र महाराज यांची टीका

भारतातील बहुसंख्य हिंदू लवकरच संपणार आहेत. आम्ही दोन आणि आमचं एक, असे हिंदू समाजाचं अपत्यांबाबतचं धोरण आहे. मी हिंदू समाजाला आवाहन करतो की, तुम्ही दोन आणि किमान तुमची दोन मुलं असली पाहिजेत. तरच हिंदू धर्म टिकेल. तुम्ही एका अपत्याला जन्म देताय, हे चूक आहे.




# बॉलीवूडचा ही-मॅन काळाच्या पडद्याआड!

धर्मेंद्र यांच्या फिल्मी कारकिर्दीबद्दल सांगायचं झाल्यास, 'फिल्मफेअर' मॅगझिनच्या पहिल्या टॅलेंट हंट स्पर्धेचे ते विजेते ठरलेले. मग त्यांनी अर्जुन हिंगोरानी यांच्या 'दिल भी तेरा हम भी तेरे'मधून अभिनय करिअरची सुरुवात केली. नंतर १९६१ मध्ये आलेल्या 'शोला और शबनम'नंतर त्यांना चांगलीच ओळख मिळाली. त्यानंतर ते १९६२ मध्ये आलेल्या 'अनपढ़'मध्ये दिसले. मग १९६३ मध्ये 'बंदिनी'मधून प्रेक्षकांच्या भेटीला आले. धर्मेंद्र यांच्या करिअरमध्ये हा एक महत्वाचा टप्पा ठरला.पुढे 'हकीकत' हा सिनेमा धर्मेंद्र यांच्या करिअरमधील महत्त्वाचा चित्रपट ठरला, जो १९६२ च्या भारत-चीन युद्धावर आधारित होता. हा चित्रपट खूप यशस्वी झाला आणि त्यातील गाणं 'अब तुम्हारे हवाले वतन साथीयों' अत्यंत लोकप्रिय झालं. नंतर धर्मेंद्र १९६६ मध्ये आलेल्या 'फूल और पत्थर'मध्ये मुख्य भूमिकेत दिसले आणि या चित्रपटाने धर्मेंद्र यांना मोठं स्टार बनवलं.

अशी यशस्वी कारकीर्द करणारे बॉलीवूडचे ही-मॅन अखेरच्या श्वासापर्यंत प्रेक्षकांचं मनोरंजन करीत राहिले. श्रीराम राघवन दिग्दर्शित 'इक्कीस' हा त्यांचा शेवटचा चित्रपट. 'सत्यकाम' आणि 'अनुपमा'मधील त्यांच्या प्रेमळ व्यक्तिरेखांपासून, ते 'शोले', 'हत्यार', 'जुगनू'सारख्या चित्रपटांतील त्यांच्या दमदार अभिनयापर्यंत... धर्मेंद्र यांनी प्रत्येक भूमिकांमधून आपली बहुआयामी प्रतिभा दाखवून दिली. अशाच या हरहुन्नरी अभिनेत्यानं आज या जगाचा अखेरचा निरोप घेतला आहे. दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांनी ८९ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर विलेपार्ले येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी अमिताभ बच्चन, सलमान खान, आमिर खान, दीपिका पादुकोण, रणवीर सिंहसह अनेक सेलिब्रिटी पोहोचत आहेत.

देओल कुटुंबीय धर्मेंद्र यांना अखेरचा निरोप देण्यासाठी स्मशानभूमीत आहे. तिथला हेमा मालिनी यांचा व्हिडीओ समोर आला आहे.बॉलीवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झालं आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण बॉलीवूडवर शोककळा पसरली आहे. गेली अनेक दशकं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा 'ही-मॅन' काळाच्या पडद्याआड गेल्यावर चाहत्यांसह बॉलीवूड कलाकारांकडून दुःख व्यक्त केलं जात आहे. याचदरम्यान त्यांच्या शेवटच्या सिनेमाचं पोस्टर सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'मॅडॉक फिल्म्स'कडून सुद्धा हे पोस्टर अधिकृतरित्या शेअर करण्यात आलं आहे.

**ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झालं आहे. वयाशी संबंधित आजारांमुळे काही दिवसांपासून ते हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. या उपचारांना ते सकारात्मक प्रतिसाद देत असल्यानं त्यांना पुन्हा घरी आणलं गेलं होतं. धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत होत असलेली सुधारणा पाहून चाहतेही खूश होते; पण अखेर आज त्यांनी जगाचा निरोप घेतला. धर्मेंद्र यांच्या निधनानं बॉलीवूडचा ही-मॅन हरपला आहे. अशाच या हरहुन्नरी अभिनेत्यानं आज निरोप घेतला आहे. त्यांच्या जाण्यानं मनोरंजनसृष्टीत एक पोकळी निर्माण झाली आहे.**




गुरबत नाम की नंगी तलवार पर चलकर मेरी जिंदगी ने तवाजन सिखा है, वक्त के नोकिले पत्थर अब क्या डराएंगे मुझे?' असा सिद्धांत घेऊन धर्मेंद्र हे त्यांचं आयुष्य जगले. शेवटी वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांनी मुंबईत अखेरचा श्वास घेतला. त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं. मात्र धर्मेंद्र म्हटलं की आजही समोर येतो तो त्यांनी साकारलेला विरु. शोले चित्रपटात विरुची भूमिका धर्मेंद्र करणार हे आधीच ठरलं होतं. जय ही भूमिका अमिताभ बच्चन यांनी केली. पण ती शत्रुघ्न सिन्हा यांना ऑफर झाली होती. हा चित्रपट आणि अमिताभ बच्चन यांची इमेज बदलून टाकणारा जंजीर चित्रपट त्यांना कसा मिळाला हे धर्मेंद्र यांनी स्वतः सांगितलं होतं.पैसे कमावावे, प्रसिद्धी कमावावी या सगळ्या पेक्षा लोकांच्या मनात घर करुन राहणं मला कायमच आवडलं आहे. वक्त चित्रपट मला ऑफर झाला होता. नंतर ते काम राज कुमारने केलं. मी चोप्रा यांना सांगितलं की मला इतक्यात मोठ्या भावाची भूमिका देऊ नका. मला मधला भाऊ करा. पण त्यांनी ते टाळलं मग मी पण ती भूमिका टाळली. जंजीर चित्रपटाची कथा मी साडेसतरा हजार रुपये देऊन सलीम खान यांच्याकडून विकत घेतली होती. माझ्याकडे तो चित्रपट पडून राहिला. प्रकाश मेहरांसह मी समाधी चित्रपट केला होता. ते माझ्या मागे लागले की जंजीर चित्रपट मला द्या मी बनवतो. मी त्यांना कथा दिली. माझी एक बहीण आहे. तिने मला शपथ घातली आणि भावनिक केलं. माझ्या घरातल्या लोकांनीही मला सांगितलं की तू जंजीर करु नकोस. मग मला खूप वाईट वाटलं. मी दुःखीही झालो होतो. मला तो चित्रपट करता आला नाही. नाही तर मीच ती भूमिका करणार होतो. प्रकाश मेहरांनी नंतर देवानंद, राज कुमार यांना सगळ्यांना विचारलं पण जंजीर अमिताभच्या नशिबात होता. त्याला तो चित्रपट मिळाला. जंजीरमुळेच अमिताभची ओळख निर्माण झाली असा किस्सा धर्मेंद्र यांनी सांगितला होता.

# प्रदूषणविरोधी आंदोलनाला राजकीय वळण

## दिल्लीत हिडमाच्या समर्थनार्थ घोषणा; 23 जणांना अटक

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिल्लीत 'इंडिया गेट'वरील निदर्शनामध्ये नक्षलवादी नेता माडवी हिडमाचे समर्थन करणाऱ्या घोषणा दिल्या गेल्यामुळे राजधानीतील हवेच्या प्रदूषणाविरोधातील आंदोलनाला राजकीय वळण मिळाले. या प्रकरणी २३ आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. त्यातील १७ जणांना तीन दिवसांची तर पाच जणांना दोन दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.**

एक जण अल्पवयीन असून, त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. या आंदोलनाच्या निमित्ताने शहरी नक्षल सक्रिय झाल्याचा आरोप भाजपने केला.दिल्लीतील हवेचे प्रदूषण रोखण्यात अपयशी ठरलेल्या केंद्र व राज्य सरकारविरोधात निदर्शने होत आहेत. 'इंडिया गेट' येथे रविवारी झालेल्या निदर्शनामध्ये नक्षलवादी हिडमाला पाठिंबा देणाऱ्या घोषणा काही आंदोलकांनी दिल्या. 'हिडमा अमर रहे, किती हिडमांना मारणार, प्रत्येक घरात एक हिडमा निर्माण होईल', अशी घोषणाबाजी केली गेली. गेल्या आठवड्यामध्ये आंध्र प्रदेशमध्ये हिडमा पोलीस चकमकीत ठार झाला होता. आदिवासींच्या हितासाठी



हिडमाने शस्त्रे हातात घेतली होती. तो शोषितांसाठी लढत होता, असा दावा घोषणाबाजी करणारे आंदोलक करत होते. आंदोलकांना पोलिसांनी बाजूला करण्याचा प्रयत्न केला पण, त्यातील काही जणांनी पोलिसांच्या डोळ्यात मिरची पावडर टाकली. पोलीस आणि आंदोलक यांच्यामध्ये झटापट झाल्याने तीन पोलीस जखमी झाले. त्यांच्यावर राम मनोहर लोहिया रुग्णालयात उपचार करण्यात आले. दिल्लीमध्ये

### आंदोलक 'शहरी नक्षलवादी'

एक जण अल्पवयीन असून, त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. या आंदोलनाच्या निमित्ताने शहरी नक्षल सक्रिय झाल्याचा आरोप भाजपने केला.दिल्लीतील हवेचे प्रदूषण रोखण्यात अपयशी ठरलेल्या केंद्र व राज्य सरकारविरोधात निदर्शने होत आहेत. 'इंडिया गेट' येथे रविवारी झालेल्या निदर्शनामध्ये नक्षलवादी हिडमाला पाठिंबा देणाऱ्या घोषणा काही आंदोलकांनी दिल्या.

फक्त जंतर-मंतर येथेच निदर्शने करण्याची परवानगी दिली जाते. इंडिया गेटवर निदर्शने करता येत नाहीत. विनापरवानगी आंदोलन केल्याबद्दल पोलिसांनी २२ जणांना अटक केली. केंद्रात व दिल्लीतही भाजपचे सरकार असून त्यांच्याविरोधात तीव्र निदर्शने होऊ लागली आहेत. त्यामध्ये नक्षलवादी नेत्याबद्दल सहानुभूती दाखवणारी घोषणाबाजी झाल्याने भाजपने ही आंदोलने गांभीर्याने घेतली आहेत. हिडमाच्या चकमकीवरून केंद्र सरकारला लक्ष्य करणे हा त्यांचा खरा उद्देश होता. हे आंदोलक 'शहरी नक्षलवादी' आहेत. नक्षलवाद्यांचे, दहशतवाद्यांचे समर्थन करणाऱ्यांना धडा शिकवला जाईल.

# ‘ठरलं तर मग’ फेम साक्षी अन् अश्विनची अनोखी जुगलबंदी!

‘ठरलं तर मग’ मालिका गेल्या काही दिवसांपासून कोर्ट केसच्या निकालामुळे प्रचंड चर्चेत आहे. ही मालिका गेली अडीच वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. याशिवाय टीआरपीमध्ये सुद्धा प्रत्येक आठवड्याला ही मालिका पहिल्या क्रमांकावर असते. यामुळे यामध्ये काम करणारे सगळेच कलाकार आता घराघरांत लोकप्रिय झाले आहेत. अर्जुन-सायलीसह प्रतिमा, पूर्णा आजी, अश्विन, साक्षी, प्रिया, महिपत ही सगळी पात्र साकारणाऱ्या कलाकारांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं आहे. ऑनस्क्रीन या मालिकेत नेहमीच नवनवीन ट्विस्ट येत असतात. सायली-अर्जुन आणि प्रियामधले वाद पाहायला मिळतात. तर, अश्विन सुद्धा साक्षी शिखरेचा या मालिकेत राग करताना दिसतो. पण, ऑफस्क्रीन या सगळ्या कलाकारांमध्ये खूपच छान बॉण्डिंग आहे.साक्षीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री केतकी पालवने नुकताच मालिकेच्या सेटवरून शेअर केलेला एक व्हिडीओ सध्या सर्वत्र चर्चेत आला आहे. यामध्ये चक्क अश्विन म्हणजेच अभिनेता प्रतिक सुरेश आणि केतकी ( साक्षी शिखरे ) एकत्र गाणं गात असल्याचं पाहायला मिळत आहे. प्रतिक सुरेश उत्तम अभिनेता आहेच पण, त्याला गायनाची सुद्धा



प्रचंड आवड आहे. त्याचे गाण्याचे रील्स व्हिडीओ बरेच व्हायरल झाले आहेत. आता प्रतिकने केतकी पालवसह “गोरी तेरी आँखे कहे...” हे लकी अली यांचं सहाबहार गाणं गायलं आहे. हा अल्बम २००१ मध्ये प्रदर्शित झाला होता. पण, आज २४ वर्षांनी सुद्धा या गाण्याची लोकप्रियता घराघरांत कायम आहे. केतकी आणि प्रतिक या दोघांनी देखील हे गाणं तितकंच सुंदररित्या सादर केलं आहे. त्यांचं हे गाणं चाहत्यांच्या सुद्धा पसंतीस उतरलं आहे.दरम्यान, मालिकेत सध्या साक्षी शिखरे जेलमध्ये असल्याचा सीक्वेन्स चालू आहे. त्यामुळे हा व्हिडीओ शूट करताना सुद्धा ती त्याच गेटअपमध्ये असल्याचं पाहायला मिळत आहे. आता खूनाच्या प्रकरणी साक्षी शिखरे किती वर्षे जेलमध्ये राहणार, तिला कोण मदत करणार या सगळ्या गोष्टींचा खुलासा मालिकेच्या आगामी भागांमध्ये करण्यात येईल.

## माझे प्रेक्षकही या पुरस्काराचे मानकरी

नुकत्याच पार पडलेल्या ६० आणि ६१ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकारांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मराठी अभिनेत्री मुक्ता बर्वेला चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. याबद्दल अभिनेत्रीने तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. यावेळी माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत मुक्ता बर्वे म्हणाली, “मला खूप छान वाटत आहे. कारण हा विशेष योगदान पुरस्कार आहे आणि चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने या विशेष हा पुरस्कार दिला जातो. महाराष्ट्र शासनाने पदार्पणापासूनच माझं कौतुक केलं आहे. माझ्या ‘चकवा’ नावाच्या सिनेमासाठी मला पदार्पणाचं पारितोषिक मिळालं होतं. त्यानंतर जवळपास पंचवीस वर्षांनी माझ्या आजवरच्या कामाचं कौतुक होत आहे. त्यामुळे आता एका विशिष्ट टप्प्यावर मी येऊन पोहोचले आहे आणि या टप्प्यावर महाराष्ट्राने माझं कौतुक केलं आहे; याचा आनंद होतो.”

## कतरिनाची ही सवय



कतरिना कैफ आणि विकी कौशल बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहे. बॉलीवूडमधील अनेक इव्हेंट्स आणि पार्टीमध्ये दोघे एकत्र दिसतात. कतरिना जेव्हा घरी असते तेव्हा माझी आई आनंदी असते, असं एका मुलाखतीत विकी म्हणाला होता. अलीकडेच ‘द वीक’ला दिलेल्या मुलाखतीत जेव्हा विकीला विचारण्यात आलं की, त्याला जेवण बनवता येतं का? तेव्हा विकी म्हणाला, “माझ्या संपूर्ण आयुष्यात जेवण करायला मला कधीच जमणार नाही. मी फक्त चहा बनवू शकतो आणि जास्तीत जास्त अंडं फोडू शकतो आणि हेसुद्धा मी कोरोना काळात शिकलो. कारण- तेव्हा मी रात्र रात्र जागून चित्रपट पाहायचो. कारण- त्या वेळेस माझ्याकडे दुसर करायला काहीच नव्हतं. सनी (विकीचा भाऊ) खूप चांगलं जेवण बनवतो. तो माझ्यापेक्षा फक्त एक वर्ष आणि चार महिन्यांनी लहान आहे. त्यामुळे आम्ही मित्रासारखेच राहतो. मी त्याला कोणताही सल्ला देत नाही आणि तो माझ्याकडून कोणताही सल्ला घेत नाही. आम्ही फक्त आमचे अनुभव एकमेकांना शेअर करतो. तो माझ्यापेक्षा खूप समजूतदार आणि शांत आहे.”विकीला पुढे जेव्हा त्याच्या घरातील खाद्यपदार्थांच्या निवडीबद्दल विचारण्यात आलं तेव्हा तो म्हणाला, “खाण्याच्या बाबतीत सांगायचं झालं, तर कतरिना माझ्यापेक्षा जास्त शाकाहारी आहे. तिला साधं खायला खूप आवडतं. फार क्वचित ती छोले-भटुरे खाते; पण मी ते आवडीने खातो. जेव्हा कतरिना घरी असते तेव्हा माझ्या आईला खूप बरं वाटतं. ती म्हणते.

## ‘असा’ असेल ‘शिवा’ मालिकेचा अंतिम भाग!



जवळपास दीड वर्षे ‘झी मराठी’ वाहिनीवर अधिराज्य गाजवणारी ‘शिवा’ मालिका अखेर प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. अलीकडेच यामधील काही कलाकारांनी सोशल मीडियावर भावुक पोस्ट शेअर करत मालिकेच्या शूटिंगचा शेवटचा दिवस पार पडल्याचं जाहीर केलं होतं. आता ‘शिवा’ मालिकेच्या अंतिम भागाचा प्रोमो ‘झी मराठी’ वाहिनीकडून इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. ‘शिवा’ मालिका सर्वांचा निरोप घेताना अखेर सुहासचं खरं रूप अखेर सर्वांसमोर उघड होणार आहे. पण, यासाठी शिवाला मोठी अग्निपरीक्षा द्यावी लागेल. सुहास शिवाला उद्ध्वस्थ करण्यासाठी तिच्या माहेरच्या आणि सासरच्या लोकांवर एकत्र हल्ला करतो. जेणेकरून कोणाच्या मदतीसाठी जायचं हा विचार करून शिवाची कोंडी होईल. कपटी सुहासने शिवाच्या घरी बॉम्ब ठेवलेला असतो. तो तिला म्हणतो, “तुझ्यासमोर फक्त दोन पर्याय आहेत. एकतर माहेरच्यांना वाचवायचं किंवा सासरच्या लोकांना...आता काय करशील?”शिवा त्याला सडेतोड उत्तर देत सांगते, “आज तुला कळेल बाईच्या मनगटात किती ताकद असते. कारण, आज मी एकटी नाहीये. माझ्या मदतीला स्पेशल क्राइम युनिट ऑफिसर तारिणी येतेय.” तारिणी म्हणजेच लोकप्रिय अभिनेत्री शिवानी सोनार. ती ‘शिवा’ मालिकेच्या अखेरच्या भागात खास एन्ट्री घेणार आहे. सुहासला धडा शिकवण्यासाठी ‘तारिणी’ शिवाला खंबीरपणे साथ देणार आहे.शिवाला पाठिंबा देत तारिणी म्हणते, “तुझ्या कुटुंबाची जबाबदारी फक्त तुझी नाहीये... आमची सुद्धा आहे.

## अभिनेत्री श्वेता मेनन कायदेशीर अडचणीत

९० च्या दशकात अभिनेता सलमान खानबरोबर ‘बंधन’ या चित्रपटात काम केलेली लोकप्रिय अभिनेत्री श्वेता मेनन एका कायदेशीर अडचणीत अडकली आहे. अभिनेत्री एका कायदेशीर वादात अडकली असून याप्रकरणी तिच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. श्वेता मेननवर ‘अश्लीलता’ पसरवल्याचा आरोप करण्यात आला असून याबद्दल तिच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ता मार्टिन यांनी श्वेता मेनन यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्टाने स्थानिक पोलिसांना कारवाईचे आदेश दिले. आता अश्लीलता प्रतिबंधक कायदा आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.श्वेता मेननने चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील दृश्यांचा वापर करून आर्थिक फायदा घेतल्याचा आरोप आहे. हा आरोप मार्टिन मेनाचरी नावाच्या सामाजिक कार्यकर्त्याने केला आहे.याप्रकरणी श्वेता मेननवर माहिती तंत्रज्ञान कायदा, कलम 67 (A) अंतर्गत गुन्हा नोंदवला गेला आहे. तक्रारीनुसार, तिच्या या कृतीमुळे तरुणांवर वाईट परिणाम होत आहे आणि ती समाजात चुकीचा संदेश देत आहे. श्वेता फक्त दक्षिणेतील अभिनेत्री नाही, तर हिंदी चित्रपटांमध्येही तिने काम केलं आहे. ‘रथिनिर्वेदम’ आणि ‘साल्ट एन पेपर’ यांसारख्या मल्याळम चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे, तर हिंदीत सलमान खानच्या ‘बंधन’ आणि ‘अशोका’ यांसारख्या चित्रपटांमध्येही ती झळकली आहे.तिने एकूण ३० हिंदी चित्रपटात काम केलं असल्याची माहिती आहे. ती शेवटची ‘बादल’ या चित्रपटात झळकली होती. दरम्यान, श्वेताने तिच्यावर झालेल्या अश्लीलतेच्या आरोपांबद्दल अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे आता याप्रकरणी श्वेता मेनन काय प्रतिक्रिया देणार?

## इटलीची हॅट्ट्रिक

## यानिक सिन्नेरच्या गैरहजेरीतही स्पेनवर सहज मात

# इटलीची डेव्हिस चषक विजेतेपदाची हॅट्ट्रिक

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**इटलीने डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा जेतेपद पटकावले. या वेळी प्रमुख खेळाडू यानिक सिन्नेरच्या गैरहजेरीतही इटलीने स्पेनवर २-० अशी सहज मात केली. माटेओ बेरेट्टिनी आणि फ्लावियो कोबोली यांनी आपल्या एकेरीच्या लढती जिंकून स्पेनविरुद्ध २-० अशी निर्णायक आघाडी घेत इटलीचे विजेतेपद निश्चित केले. स्पेनचा संघ २०१९ नंतर प्रथमच स्पर्धेची अंतिम लढत खेळत होता.**

## स्पेनविरुद्ध २-० अशी निर्णायक आघाडी



इटलीचे हे चौथे, तर सलग तिसरे विजेतेपद ठरले. यापूर्वी १९६८ ते ७२ या कालावधीत सलग तीन विजेतेपद मिळविणारा अमेरिका एकमेव देश होता. अमेरिकेने पाच वेळा ही स्पर्धा जिंकली आहे.

इटलीने १९७६ मध्ये सर्व प्रथम ही स्पर्धा जिंकली. त्यानंतर २०२३, २०२४ मध्येही त्यांनी विजेतेपद मिळवले होते. मात्र, मायदेशात डेव्हिस चषक जिंकण्याची ही त्यांची पहिलीच वेळ ठरली.गेल्या दोन वर्षांत इटलीला पुरुषांच्या टेनिसमध्ये मोठ्या उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या सिन्नेरने नव्या हंगामाच्या तयारीसाठी या वेळी डेव्हिस चषकातून माघार घेतली. लॉरेन्झो मुसेट्टीही खेळत नव्हता. यानंतरही इटलीने उपांत्यपूर्व फेरीत ऑस्ट्रिया, उपांत्य फेरीत बेल्जियम आणि अंतिम फेरीत स्पेनवर मात केली.अंतिम लढतीत बेरेट्टिनीने स्पेनच्या पाब्लो कॅरेनो बुस्टाचा ६-३, ६-४ असा पराभव केला. त्यानंतर कोबोलीने पहिला सेट गमाविल्यावर दमदार पुनरागमन करताना ग्वामे मुनारचे आव्हान १-६, ७-६ (७-५), ७-५ असे परतवून लावले. कोबोलीने विजयी गुण घेतल्यावर आनंदाने उडी मारत आपली रॅकेट कोर्टवरच सोडून दिली आणि त्यानंतर त्याच्या सहकाऱ्यांनी कोबोलीला हवेत उंचावले.पुढील वर्षी डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेच्या पात्रता फेरीत भारताची गाठ नेदरलँड्सशी पडणार आहे.

फेब्रुवारीमध्ये होणारी ही लढत भारतात होणार असून, यजमानपदासाठी नवी दिल्ली आणि कर्नाटकने इच्छा व्यक्त केली आहे. ही लढत हार्ड कोर्टवर ६, ७ किंवा ७, ८ फेब्रुवारीस अपेक्षित आहे. यजमान देशाला यापैकी एक तारीख निवडण्याची मुभा आहे.इटलीने डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा जेतेपद पटकावले. या वेळी प्रमुख खेळाडू यानिक सिन्नेरच्या गैरहजेरीतही इटलीने स्पेनवर २-० अशी सहज मात केली.माटेओ बेरेट्टिनी आणि फ्लावियो कोबोली यांनी आपल्या एकेरीच्या लढती जिंकून स्पेनविरुद्ध २-० अशी निर्णायक आघाडी घेत इटलीचे विजेतेपद निश्चित केले. स्पेनचा संघ २०१९ नंतर प्रथमच स्पर्धेची अंतिम लढत खेळत होता. इटलीचे हे चौथे, तर सलग तिसरे विजेतेपद ठरले. यापूर्वी १९६८ ते ७२ या कालावधीत सलग तीन विजेतेपद मिळविणारा अमेरिका एकमेव देश होता. अमेरिकेने पाच वेळा ही स्पर्धा जिंकली आहे.इटलीने १९७६ मध्ये सर्व प्रथम ही स्पर्धा जिंकली. त्यानंतर २०२३, २०२४ मध्येही त्यांनी विजेतेपद मिळवले होते.

मात्र,मायदेशात डेव्हिस चषक जिंकण्याची ही त्यांची पहिलीच वेळ ठरली.गेल्या दोन वर्षांत इटलीला पुरुषांच्या टेनिसमध्ये मोठ्या उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या सिन्नेरने नव्या हंगामाच्या तयारीसाठी या वेळी डेव्हिस चषकातून माघार घेतली. लॉरेन्झो मुसेट्टीही खेळत नव्हता. यानंतरही इटलीने उपांत्यपूर्व फेरीत ऑस्ट्रिया, उपांत्य फेरीत बेल्जियम आणि अंतिम फेरीत स्पेनवर मात केली.अंतिम लढतीत बेरेट्टिनीने स्पेनच्या पाब्लो कॅरेनो बुस्टाचा ६-३, ६-४ असा पराभव केला. त्यानंतर कोबोलीने पहिला सेट गमाविल्यावर दमदार पुनरागमन करताना ग्वामे मुनारचे आव्हान १-६, ७-६ (७-५), ७-५ असे परतवून लावले. कोबोलीने विजयी गुण घेतल्यावर आनंदाने उडी मारत आपली रॅकेट कोर्टवरच सोडून दिलीफेरीत भारताची गाठ नेदरलँड्सशी पडणार आहे. फेब्रुवारीमध्ये होणारी ही लढत भारतात होणार असून, यजमानपदासाठी नवी दिल्ली आणि कर्नाटकने इच्छा व्यक्त केली आहे. ही लढत हार्ड कोर्टवर ६, ७ किंवा ७, ८ फेब्रुवारीस अपेक्षित आहे. यजमान देशाला यापैकी एक तारीख निवडण्याची मुभा आहे.

### इटलीचे विजेतेपद निश्चित केले

१९६८ ते ७२ या कालावधीत सलग तीन विजेतेपद मिळविणारा अमेरिका एकमेव देश होता. अमेरिकेने पाच वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. इटलीने १९७६ मध्ये सर्व प्रथम ही स्पर्धा जिंकली. त्यानंतर २०२३, २०२४ मध्येही त्यांनी विजेतेपद मिळवले होते. मात्र, मायदेशात डेव्हिस चषक जिंकण्याची ही त्यांची पहिलीच वेळ ठरली.गेल्या दोन वर्षांत इटलीला पुरुषांच्या टेनिसमध्ये मोठ्या उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या सिन्नेरने नव्या हंगामाच्या तयारीसाठी या वेळी डेव्हिस चषकातून माघार घेतली.

# माझं १० लिटर रक्त घटल्यासारखं वाटतंय


## सचिन तेंडुलकरची धर्मेंद्र यांच्या निधनानंतर भावुक करणारी पोस्ट

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं आज २४ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी निधन झालं आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या घरीच उपचार सुरू होते. मनोरंजन विश्वातील अनेकांनी पोस्ट शेअर करत धर्मेंद्र यांच्या निधनाची माहिती दिली. देओल कुटुंबाकडून धर्मेंद्र यांच्यावर विलेपार्ले येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. धर्मेंद्र यांच्या निधनानंतर दिग्गज खेळाडू सचिन तेंडुलकर याने केलेली पोस्ट सध्या चर्चेत आहे.**





सिनेसृष्टीत गेली अनेक दशकं अधिराज्य गाजवणाऱ्या धर्मेंद्र यांची एक्झिट सर्वांनाच वेदना देणारी आहे. मनोरंजन विश्वातील कलाकारांसह क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंनीही धर्मेंद्र यांना श्रध्दांजली वाहिली. सुरेश रैना, शिखर धवन, वीरेंद्र सेहवाग अशा क्रिकेटपटूंनी पोस्ट शेअर करत त्यांना श्रद्धांजली वाहिली.मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने पोस्ट करत लिहिलं, "इतर अनेकांप्राणे मलाही धर्मेंद्रजी पहिल्या भेटीतच भावले. उत्तम अभिनेता म्हणून त्यांच्या बहुगुणी प्रतिभेन आपलं वर्षानुवर्षे मनोरंजन कलं.. पण प्रत्यक्षात भेटल्यानंतर पडद्यावरचं ते नातं अधिक घट्ट झालं. त्यांच्यातील एनर्जी प्रचंड कमाल होती की त्यांच्या सहवासात क्षणात उत्साह वाढून जायचा. ते कायम मला म्हणायचे, 'तुला पाहून माझं लिटरभर रक्त वाढतं.'"त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अशी नैसर्गिक ऊब होती की त्यांच्या आसपास असलेल्या प्रत्येकाला आपण खास आणि महत्त्वाचे आहोत, अशी जाणीव व्हायची. त्यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वाचा चाहता नसणं हे अशक्यचं होतं. आज त्यांच्या जाण्याने अंतःकरण भरून आलंय, असं वाटतंय की माझं १० लिटर रक्त घटलंय... धर्मेंद्रजी तुम्ही कायम स्मरणात राहाल.

### धर्मेंद्रजी व सचिनचं बॉन्डिंग

धर्मेंद्रजींनी एकदा सचिन तेंडुलकरची विमान प्रवासात भेट झाल्यानंतर एक पोस्ट शेअर केली होती. ही पोस्टदेखील व्हायरल झाली होती. त्या पोस्टमध्ये धर्मेंद्रजी यांनी लिहिलं होतं की जेव्हा जेव्हा मला सचिन भेटला आहे, तेव्हा तो माझा लाडका लेक म्हणूनच भेटला आहे. यावरून धर्मेंद्रजी व सचिनचं बॉन्डिंग किती छान होतं, याचा अंदाज आपण लावू शकतो.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार।

। दि. 25 नोव्हेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### मिशन- PCMC : कुदळवाडी परिसरातील

# मतदार स्थळपाहणीबाबत हरकत!

## आमदार महेश लांडगे यांची महापालिका आयुक्तांना निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रारुप मतदार यादीत कुदळवाडी व परिसर प्रभाग क्रमांक 2 आणि 11 मध्ये झालेल्या स्थळपाहणीबाबत आमदार महेश लांडगे यांनी हरकत नोंदवली आहे. याबाबत महापालिका प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर यांना लेखी निवेदन दिले आहे. तसेच, स्थळपाहाणी अहवालाबाबत प्रश्नही उपस्थित केले आहेत.**




> “ महानगरपालिका प्रशासनाने जर स्थळपाहणी केली असेल आणि अहवाल तयार केला असेल, तरी त्यात स्थलांतरीत मतदारांचा उल्लेख झालेला दिसत नाही. ही बाब निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी चिंताजनक आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे ही हरकत नोंदवण्याची सूचना महापालिका प्रशासनाला केली असून, लवकरात लवकर योग्य पद्धतीने कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिलेल्या अर्जामध्ये म्हटले आहे की, महानगरपालिकेने फेब्रुवारी 2025 मध्ये कुदळवाडी परिसरात सुमारे 827 एकर क्षेत्रावर अनधिकृत अतिक्रमणावरील कारवाई केली होती. 8 ते 17 फेब्रुवारी दरम्यान एकूण 4 हजार 111 अतिक्रमण हटवण्यात आले, ज्यामध्ये 3 कोटी 60 लाख 58 हजार 746 चौ.फुट क्षेत्र अवैध अतिक्रमणमुक्त करण्यात आले. “या भागातील जमीनदोस्त केलेल्या मिळकतींवर पूर्वी राहणाऱ्या मतदारांचा उल्लेख स्थळपाहणी अहवालात केला आहे का? किंवा याबाबत कोणतेही अद्ययावत दाखले प्रारुप मतदार यादीमध्ये दिसत नाहीत. त्यामुळे या भागातील काही मतदार स्थलांतरीत झाले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.”

आमदार लांडगे यांनी प्रशासनाला प्रभाग क्रमांक 2 आणि 11 मधील कुदळवाडी अतिक्रमण कारवाई केलेल्या भागात पुनः स्थळपाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवण्याची विनंती केली आहे.

आमदार लांडगे यांनी मांडलेल्या आकडेवारीतून दिसते की: प्रभाग क्रमांक 2 मधील 170, 171, 172 यादी भागांमध्ये 2024 मध्ये 4,048 मतदार होते. प्रारुप यादीमध्ये 4,078 मतदारांची नोंद आहे, परंतु योग्य स्थळ निरीक्षण केल्यास फक्त 650 मतदार राहण्याची अपेक्षा आहे. प्रभाग क्रमांक 11 मधील 62 ते 67 यादी भागांमध्ये 2024 मध्ये 8,536 मतदार होते, तर प्रारुप यादीमध्ये 8,350 मतदार आहेत; योग्य स्थळ निरीक्षण केल्यास अंदाजे 2,500 मतदार राहण्याची शक्यता आहे.

# मुलधारा हेरिटेज क्लबची चिंचवड गावात हेरिटेज वॉक

## शिक्षण विश्व : एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाइनचा उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाइन मधील “मुलधारा हेरिटेज क्लब” च्या सर्व विद्यार्थी सभासदांनी चिंचवड गाव आणि परिसरात हेरिटेज वॉकचे आयोजन केले होते. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. पिंपरी चिंचवड शहराचा धार्मिक आणि आध्यात्मिक वारसा असणारे मोरया गोसावी मंदिर, राम मंदिर, मंगलमुर्ती वाडा, क्रांतिवीर चापेकर वाडा येथे भेट देऊन त्याचे सांस्कृतिक आणि वास्तुशिल्पीय महत्व समजून घेतले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन मधील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले जातात. त्या अंतर्गत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ऐतिहासिक वारसा स्थळांना भेट देणे, त्यांची माहिती घेणे, वास्तुशिल्पीय महत्त्व समजून घेणे असे उपक्रम “मुलधारा हेरिटेज क्लब” च्या माध्यमातून राबविले जातात. यामुळे परिसराच्या ऐतिहासिक सांस्कृतिक वारशाची आणि तत्कालीन काळातील वास्तुरचनेची माहिती मिळते. या वारसा अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी स्केचिंग सत्र राबविले. यामुळे स्थळांचे निरीक्षण करणे, नोंद वही ठेवणे आणि पर्यावरण पूरक संवेदनशीलतेने वास्तु उभारणे असे अनुभव विद्यार्थ्यांना मिळाले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबच्या अध्यक्ष जान्हवी भोसले, उपाध्यक्ष दिशा प्रधान, सचिव श्वेता शिंदे, खजिनदार मानव कोतफोडे, सदस्य सुकन्या गवडे, प्राची देशपांडे आणि समृद्धा कदम व मार्गदर्शक आर्किटेक्ट अभिषेक रांका यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी मुलधारा हेरिटेज क्लबचे कौतुक केले.

## तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात

# युनिव्हर्सल ह्यूमन व्हॅल्यू कार्यशाळेतून मानवी मूल्यांचे धडे!

### शिक्षण विश्व: डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आकुर्डी येथे तीन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आकुर्डी येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या नवी दिल्ली मान्यतेने आयोजित युनिव्हर्सल ह्यूमन व्हॅल्यू विषयावरील तीन दिवसीय कार्यशाळा १९ ते २१ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत यशस्वीरीत्या संपन्न झाली. कार्यशाळेला एआयसीटीई नवी दिल्लीकडून प्रमुख प्रशिक्षक डॉ महेश कोलते सहाय्यक प्रशिक्षक डॉ अनिता माने आणि निरीक्षक रेवती देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.**



समारोप कार्यक्रमास डॉ डी वाय पाटील शैक्षणिक संकुलाचे संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम मुख्य वित्तीय अधिकारी बिपिन शर्मा डी वाय पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ नीरज व्यवहारे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ पी मालती प्रशासकीय अधिष्ठाता डॉ संदीप सरनोबत तसेच कार्यशाळेचे समन्वयक सिव्हिल अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ अशोक मोरे यूएचव्ही अधिष्ठाता डॉ लतिका देसाई आणि ईएनटीसी विभागाच्या सहायक प्राध्यापक डॉ मनीषा राजपूत उपस्थित होते.

कार्यशाळेत समग्र विकासातील शिक्षणाची भूमिका स्वतःचा शोध ,सुख समृद्धी मानवी सुसंवाद कौटुंबिक विश्वास, कुटुंबातील आणि समाजातील सुसंवाद तसेच निसर्गाशी संतुलित नाते अशा विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

समन्वयक डॉ अशोक मोरे यांनी तीन दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा मांडला. मुख्य वित्तीय अधिकारी बिपिन बिहारी शर्मा यांनी मूल्य शिक्षणामध्ये सार्वभौमिकता तर्कसंगतता सत्यापन क्षमता आणि सामंजस्य यांचा समावेश असणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्राध्यापक मृणालिनी शेवाळे प्रणिता मांजरे ललितराव अमृतसागर आणि राजश्री इंगळे यांनी कार्यशाळेतून आनंद समृद्धी विश्वास यांसारख्या संकल्पनांची खऱ्या अर्थाने जाण मिळाल्याचे मनोगत व्यक्त केले.

प्रशासकीय अधिष्ठाता डॉ संदीप सरनोबत यांनी भारतीय वेदांताच्या आधारे आनंद हा ध्येय नसून प्रवास असल्याचे प्रतिपादन केले.

प्राचार्य डॉ नीरज व्यवहारे यांनी निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचे महत्व सांगत माणसाचा आनंद केवळ भौतिक सुखावर नव्हे तर आत्मिक समाधानावर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले.महाराष्ट्रातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून १२५ हून अधिक प्राध्यापकांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ लतिका देसाई यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शैक्षणिक संकुलाचे चेअरमन सतेज पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस पाटील संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम प्राचार्या डॉ पी मालती आणि प्रशासकीय अधिष्ठाता डॉ संदीप सरनोबत यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

---

# विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड प्रशिक्षणाचा अनुभव!

### शिक्षण विश्व: व्ही के माटे हायस्कूलचा स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना पाचगणी येथे प्रशिक्षण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: चिंचवड येथील मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही के माटे हायस्कूलमधील स्काऊट आणि गाईड विद्यार्थ्यांचे एक दिवसाचे मुक्कामी शिबिर पाचगणी भुतेंघर महाबळेश्वर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.**



प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर तसेच स्काऊट मास्टर हनुमंत हुचगोळ आणि गाईड कॅप्टन अनिता बोरसे यांच्या संकल्पनेतून हे शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनावेळी स्काऊट गाईड ध्वजाचे ध्वजारोहण उपमुख्याध्यापक दिलीप कुमावत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्शल कॅडेट फोर्सचे व्यवस्थापक बोराडे आणि सदाशिव जाधव तसेच त्यांचे सहकारी उपमुख्याध्यापक दिलीप कुमावत स्काऊट मास्टर हनुमंत हुचगोळ अनिल तिटकरे गाईड कॅप्टन अनिता बोरसे मनीषा लोहार अपेक्षा गव्हाणे तसेच शिबिर स्थळाच्या इन्चार्ज तेजस्विनी उपस्थित होते.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना झिप लाईन वॉल क्लाइंबिंग क्राउलिंग बॅलन्सिंग हाय जंप आर्चरी गन शूटिंग सिमेंट ब्लॉक ॲक्टिव्हिटी टायर्स ॲक्टिव्हिटीज वॉल जम्पिंग अशा विविध साहसी उपक्रमांचे प्रशिक्षण देण्यात आले.

**विद्यार्थ्यांनी घेतला जंगल सफारीचा आनंद**

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना परिसरातील साईट सीन दाखवण्यात आले. त्यानंतर ट्रेकिंग आणि जंगल सफारीच्या माध्यमातून प्रशिक्षण स्थळी विद्यार्थ्यांनी एडवेंचर प्रवास पूर्ण केला. यानंतर रेन डान्स संगीत खुर्ची आणि स्विमिंगचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांसाठी दोन्ही दिवस चहा नाश्ता तसेच उत्तम दुपारचे आणि रात्रीचे जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थी अधिक उत्साही आणि आनंदी दिसत होते. एकूण ११६ विद्यार्थी आणि सहा शिक्षक या शिबिरात सहभागी झाले होते.

**कडाक्याच्या थंडीतही विद्यार्थ्यांचा उत्साह**

थंडीचा सामना करत विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रम उत्साहात पूर्ण केले. रात्री शेकोटी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना तत्काळ विविध विषय देऊन सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यास सांगण्यात आले आणि विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण करून वेगळा अनुभव घेतला. अत्यंत आनंदी ऊर्जावान आणि प्रसन्न वातावरणात व्ही के माटे हायस्कूलचे स्काऊट गाईड शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

## तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात

# सुश्रुती 2025 आंतरराष्ट्रीय शल्य-वैद्यक परिषदेची उत्साहात सांगता

## शिक्षण विश्व : जागतिक तज्ज्ञांच्या उपस्थितीत शल्य प्रशिक्षण सत्रांचा यशस्वी समारोप

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद व संशोधन केंद्र आणि NIMA OBGY सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘सुश्रुती २०२५’ आंतरराष्ट्रीय शल्य वैद्यक परिषद’ तीन दिवसांच्या शैक्षणिक, संशोधननिष्ठ आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रमांनी उत्साहात संपन्न झाली. आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यक यांचा एकात्मिक दृष्टिकोन मांडत शल्य वैद्यकीय विज्ञानाला नवे दिशा देणारी ही परिषद देशविदेशातील तज्ज्ञ, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रभावी परिषदेचे आयोजन कुलपती डॉ. पी. डी. पाटील, आणि प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले..**




उद्घाटन सोहळ्यास महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्र-कुलगुरू डॉ. स्मिता जाधव, कुलसचिव डॉ. जे. एस. भवाळकर तसेच NIMA OBGY सोसायटीतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

परिषदेच्या उद्देशांसंदर्भात बोलताना डॉ. स्मिता जाधव यांनी वैद्यकशास्त्र आणि प्रगत तंत्रज्ञान यांचा संगम ही भविष्यकालीन आरोग्यसेवेची गरज असल्याचे सांगितले. तर माधुरी मिसाळ यांनी एकात्मिक आणि रुग्णकेंद्री सेवांना गती देण्यासाठी अशा परिषदांचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. पी. डी. पाटील यांनी ज्ञान, संशोधन आणि नवोपक्रम या त्रिसूत्रीवर आधारित आरोग्यव्यवस्था निर्माण करण्याची विद्यापीठाची बांधिलकी व्यक्त केली.

**पिंपरी-चिंचवड स्थानिक व्यवसाय**

### ‘सिझेरियन’ लाइव्ह डेमो ठरले विशेष आकर्षण!

परिषदेतील अटोनिक PPH, OBSTETRIC SUTURING, ट्रॉमा-रिपेयर, इन्स्ट्रुमेंटल डिलिव्हरी आणि गर्भसंस्कार अशा शल्य-प्रशिक्षण सत्रांना विद्यार्थ्यांसह तज्ज्ञांकडूनही मोठा प्रतिसाद मिळाला. फॉर्सेप्स, व्हॅक्यूम आणि उच्च जोखीम सिझेरियन सेक्शन प्रक्रियेचे लाइव्ह डेमो विशेष आकर्षण ठरले

यावर्षीचा लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्कार स्त्रीरोग-प्रसूतीशास्त्रातील उल्लेखनीय योगदानासाठी प्रख्यात तज्ज्ञ डॉ. सुधा महादेवकर यांना प्रदान करण्यात आला. ‘बेस्ट आयुर्वेद इन्स्टिट्यूट इनिशिएटिव्ह’ अंतर्गत S.S.A.M. हडपसर (प्रथम), S.D.M. हसन (द्वितीय) आणि शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, धाराशिव (तृतीय) यांचा गौरव करण्यात आला. प्री-कॉन्फरन्स कार्यशाळेला तब्बल 600 नोंदी प्राप्त झाल्या, तर 160 संशोधनपत्रांपैकी 90 सादर करण्यात आली. 11 पोस्टर्स निवडण्यात आले, त्यांपैकी 5 पोस्टर्स वैज्ञानिक चर्चासत्रात महत्त्वाचा भाग ठरले. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. कामिनी धिमान, डॉ. प्रशांत खाडे, डॉ. प्रियांका नाकाडे, डॉ. सुहास हेरलेकर, डॉ. प्रदीप मुसळे, डॉ. स्मृतिका तावरे आणि डॉ. विष्णू बावणे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. समारोप सोहळा ८ प्लेनरी सेशन्स, मेडिको-लीगल नाटिका आणि पारितोषिक वितरण कार्यक्रमाने संपन्न झाला. ‘सुश्रुती २०२५’ ने एकात्मिक शल्य-वैद्यकीय विज्ञानासाठी नव्या संशोधन दिशा उघडत यशस्वी नोंद केली.




www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune